महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन ज्ञापन क्र. दुरुस्ती-०११९/प्र.क्र.१४३/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक २० जुलै २०१९.

विषय :- पोलीस अधीक्षक, पालघर, यांच्या आस्थापनेवरील पोलीस लाईन, मोखाडा, तालुका-मोखाडा, येथील कर्मचारी निवासी इमारत क्र.३ याच्या दुरुस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-
1) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
2) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
3) पोलीस महासंचालक, म.रा, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ १९-ए/ विपोमनि-कोकण-परिक्षेत्र/ दुरुस्तीचे-प्रस्ताव/ ६६/ २०१९, दिनांक ०१.०६.२०१९.

ज्ञापन.

पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाने पोलीस अधीक्षक, पालघर, यांच्या आस्थापनेवरील पोलीस लाईन, मोखाडा, तालुका-मोखाडा, येथील कर्मचारी निवासी इमारत क्र.३ याच्या दुरुस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी रु.२५,६४,६०४/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त खर्चाचे अंदाज हे उप अभियंता, सा.बां. उपविभाग, मोखाडा, यांनी सन २०१८-१९ च्या राज्य दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जव्हार, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते रु.२५,६४,६००/- असे सुधारित केले आहेत व त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास, विवक्षित अटींवर, सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, पोलीस अधीक्षक, पालघर, यांच्या आस्थापनेवरील पोलीस लाईन, मोखाडा, तालुका-मोखाडा, येथील कर्मचारी निवासी इमारत क्र.३ याच्या दुरुस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी रु.२५,६४,६००/- *(रुपये पंचवीस लक्ष, चौसष्ट हजार, सहाशे फक्त)* इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

1) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरू नये;
2) पोलीस अधीक्षक, पालघर, यांनी उक्त खर्चाचे अंदाज साक्षांकित करणे आवश्यक आहे.

५. उक्त खर्च हा गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, ००, १०९, जिल्हा पोलीस, (००) (००)(०१) जिल्हा पोलीस बल (२०५५ ०१६८) (दत्तमत)(अनिवार्य), २७-लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे शासन ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२७१/ २०१९/ इमा.-२, दिनांक २१.०६.२०१९, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७२०११५८२१४७२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.07.20 12:06:27 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.
३) पोलीस अधीक्षक, पालघर.

प्रत-

१) कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जव्हार, जिल्हा-पालघर *(सा.बां. विभाग, मंत्रालय, यांनी सुधारित केलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) निवड फाईल (पोल-७).